माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य मुख्य माहिती आयोग

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९१८४ फॅक्स क्र.०२२-२२०४९३९०.

क्र. मुमाआ-२०२३/प्र.क्र. ७२/०१ दिनांक : २२.१२.२०२३

**प्रति,**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

**विषय :** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ च्या तरतुदींच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी सदर अधिनियमाच्या कलम २५ (५) प्रमाणे शिफारशी करण्याबाबत.

**संदर्भ :** Writ Petition (civil) No. ९९०/२०२१ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १७.०८.२०२३ चे आदेश.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २५ (५) अन्वये खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात येत आहेत :-

१. कलम ४ (१) नुसार माहिती प्रसिध्द करण्याबाबत योग्य ते निर्देश दयावेत.

२. कलम ४ (१) नुसार माहिती प्रसिध्द करण्यासाठी जबाबदार अधिकारी निश्चित करावे.

३. कलम ४ (१) नुसार १७ मुद्यांबाबत प्रसिध्द करावयाच्या माहितीबाबत सूचना निर्गमित करण्यात याव्यात.

४. कलम ४ च्या अमंलबजावणीसाठी त्रयस्थ पक्षातर्फे पारदर्शक अंकेक्षण (Transparent Third Party Audit) करण्याकरीता शासकीय प्रशिक्षण संस्था यांची निवड करावी.

५. कलम ४ (१) नुसार माहिती तिमाही (Quarterly) अद्यावत करण्याबाबत योग्य ते निर्देश दयावेत.

६. जिल्हाधिकारी हे कलम ४ चे समन्वय अधिकारी आहेत. त्यांनी समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांच्या वार्षिक स्वयंमूल्यनिर्धारण अहवालामध्ये (Annual Self Assessment Report) नमूद करण्याबाबत योग्य ते निर्देश दयावेत.

**(समीर सहाय)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**